# उभारी पथकामार्फत दुष्काळग्रस्त मराठवाड्यात प्रत्येक गावात पाच स्वंयसेवक नेमणार - खासदार चंद्रकांत खैरे

## जिल्ह्यातील १३७२ गावात ६८६० सदस्यांना लवकरच दिलासा स्वंयसेवी संस्थेमार्फत प्रशिक्षण

**संभाजीनगर ( ता.१३ ) :** सतत दुष्काळग्रस्त परिस्थिती गारपीट, अशा नैसर्गिक आपत्तीला तोंड देण्याऱ्या बळीराजाला शिवसेनेच्यावतीने कायम आधार देण्याचे काम पक्षप्रमुख उध्दव ठाकरे, युवासेनाप्रमुख आदित्य ठाकरे करित आहे, उर्वरित शेतकऱ्यांच्या मनाला धीर देण्यासाठी, नैराश्यातुन सकारात्मक जीवन जगण्यासाठी, कुटूंबियांना धैर्य देण्यासाठी शिवसेना पक्षाच्यावतीने मराठवाड्यातील प्रत्येक गावात व संभाजीनगर जिल्ह्यातील १३७२ गावात उभारी पथकांची स्थापना करण्यात येणार असल्यांची माहिती शिवसेना उपनेते खासदार चंद्रकांत खैरे यांनी शिवसेना भवन येथे झालेल्या जिल्हास्तरीय बैठकित दिली. यावेळी दिलासा संस्थेचे संजीव उन्हाळे, डॉ. अनघा उन्हाळे, जिल्हाप्रमुख सुहास दाशरथे, नरेंद्र त्रिवेदी यांनी ही उभारी पथकांच्या सदस्यांना मार्गदर्शन केले.

शिवसेना पक्षप्रमुख उध्दव ठाकरे यांनी मागील महिन्यात संभाजीनगर जिल्हात दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांना मदतीचा धीर दिला होता. संपूर्ण राज्यात आत्महत्या मुक्त राज्य बनविण्यासाठी प्रत्येकाने आपआपल्या परिने प्रयत्न करण्याचे आवाहन त्यांनी केले होते, यावेळी त्यांनी संपूर्ण मराठवाड्यात उभारी पथक जाहीर केले होते. उभारी पथकामार्फत प्रत्येक गावातील सरपंच, ग्रामसेवक, पोलिस पाटील, निवृत्त शासकिय कर्मचारी, शिवसैनिक, सामाजिक कार्यकर्ते आदिंचा समावेश या पथकामध्ये दुष्काळग्रस्त भागातील शेतकऱ्यांना विविध शासकिय योजना, शेतकऱ्यांच्या मुलींचे लग्न, कर्जबाजारीपणा, बँका, वित्तीश संस्था आदिंचे कामे करुन देणे, विविध समस्यांचे, प्रश्नांचे निराकरण करणे, पक्षाला वेळोवेळी माहिती देणे, मदत केंद्र स्थापन करणे, असा नित्याचा उपक्रम उभारी पथक करणार असल्याची माहिती शिवसेना उपनेते खासदार चंद्रकांत खैरे यांनी दिलासा संस्थेच्यावतीने डॉ. अनघा उन्हाळे व व संजीव उन्हाळे यांनी दिलासा संस्थेच्यावतीने मास्टर प्लॉन कसा आखला आहे.

संपूर्ण नियोजन, मार्गदर्शन, स्वंयसेवक प्रशिक्षण शेतकऱ्यांना मानसिक व वैयक्तिक प्रबोधनाचे काम कसे करायचे, याबाबत सखोल माहिती देण्यात आली, माहिती पुस्तिका, सदस्यांचाचे वर्तुळ, अभ्यासगट, तालुकानिहाय माहिती गोळा करुन शासनाला पुरविणे, आदिंची माहिती देण्यात आली.

या बैठकिस उपजिल्हाप्रमुख नंदकुमार घोडेले, गणेश चोपडे, बंडु ओक, राजेंद्र राठोड, रघुनाथ चव्हाण, बाबासाहेब जगताप, तालुकाप्रमुख डॉ अण्णासाहेब शिंदे, जिल्हायुवाधिकारी ऋषिकेश खैरे, प्रा. रमेश बोरनारे, बप्पा दळवी, प्रकाश दुबे, अंकुश सुंब, अशोक शिंदे, दिलीप मचे, किशोर अग्रवाल, विजय जाधव, सुनिल मिरकर, सोमनाथ परदेशी, प्रकाश चव्हाण, किशोर कुकलारे, पं.सं. सभापती विलास भुमरे, कृष्णा राठोड, मनाजी मिसाळ, राजु राठोड, शिवाजी बनकर, राधाकृष्ण गायकवाड, संजय निकम, किशोर नागरे, गिरिजाराम हाळनोर, गोपाल कुलकर्णी, दिग्विजय शेरखाने, सचिन खैरे, संजय मोटे, दिलीप मुठ्ठे, अशोक दाबके, युवासेनेचे शुभम पिवळ, भागीनाथ रिठे, किरण गायकवाड, बाबासाहेब डांगे, रमेश तारापुरे, हिवाळे पाटील, अनिल राठोड, गुलाबराव मोरे, सुधीर भाले, डॉ. मोहन जोशी, विरभद्र गादगे, राजुकाका नरवडे, नकूल मुळे, गोविंद तांगडे, आदिंसह शहरी व ग्रामीण भागातील कार्यकर्ते, शिवसैनिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यालय : ''खैरे निवास'', वसंत भवन समोर, मच्छली खडक, संभाजीनगर-४३१ ००१. दुरध्वनी : ( ०२४० ) २३३११२५, २३३१२२५. फॅक्स : ( ०२४० ) २३४३०२५

cbkhaire@gmail.com , ganeshwagh4400@gmail.com manojwadgaonakar@gmail.com

8484066606/9604384400/8983560831